# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २७/१२/२०१८ रोजी (का.प.क्र.१८) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

गुरुवार दिनांक २७/१२/२०१८ रोजी (का.प.क्र.१८) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:४० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त,श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०३. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०४. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०५. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०६. स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
०७. स.स.श्री.पुनमचंद सोनाजी बमणे
०८. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
०९. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
१०. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
११. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्री.गजानन बारवाल : माजी उपमहापौर श्रीमती स्मिता घोगरे यांचे सासरे श्री.नामदेव घोगरे यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.सिध्दांत शिरसाट : यास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : माजी उपमहापौर श्रीमती.स्मितताई घोगरे यांचे सासरे श्री.नामदेव घोगरे यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले त्यांना सभागृहातर्फे २ मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

(यावेळी स्व.नामदेव घोगरे यांना दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.गजानन बारवाल : श्री.केंद्रे मुख्य लेखाधिकारी यांचे बाबत सभागृहाने निर्णय घेतला होता त्याचे काय झाले.

श्रीमती.शेख नरगीस :श्री.केंद्रे मुख्य लेखाधिकारी यांच्यावर काय कारवाई झाली त्याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : अतिरिक्त आयुक्त यांनी खुलासा करावा.

अति.आयुक्त : लेखा विभागाशी चर्चा करुन जी उपलब्ध कागदपत्रे मिळाली आहेत त्याचा अहवाल शनिवार पर्यंत सादर करण्यात येईल.

मा.सभापती : श्री.केंद्रे यांना निलंबित करण्यात यावे म्हणुन सभागृहाने निर्णय घेतला होता. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अवमान करणे, बेशिस्तपणे वागणे, भ्रष्टाचारी प्रमाणे लेखा विभागाचा कारभार चालवणे असे आरोप स.सदस्यांनी केलेले असल्या नंतर स्थायी समितीने त्यांना निलंबित करण्याचा निर्णय घेतला होता. आठ दिवसाचा वेळ सर्वसाधारण सभेने मा.आयुक्तांना दिला. आज सोळा दिवस झाले कारवाई करण्यात आलेली नाही. आज पुन्हा स्थायी समितीच्या वतीने श्री.केंद्रे यांना त्वरित निलंबित करावे अशा प्रकारची सुचना प्रशासनाला देण्यात येते.

श्रीमती.शेख नरगीस : तीन महिन्यापुर्वी कैसर कॉलनीमधील उर्दु लॅबररी मध्ये लोटा कारंजा येथुल नवीन पुस्तके विकत घेण्याचे सांगितले होते. त्याचे काय झाले.

अति.आयुक्त : पुस्तकांची ऑर्डर दिलेली आहे.

श्रीमती.शेख नरगीस : हॉस्पिटल बाबत मागच्या तीन चार बैठकीपासुन सांगत आहे परंतु काहीच कार्यवाही करण्यात येत नाही. तिथे वाचमॅन नाही, इतर कर्मचारी नाही.

आरोग्य अधिकारी(वैद्य): याबाबतची संचिका सादर झालेली आहे मा.आयुक्तांनी लेखा विभागाकडे पाठवलेली आहे. मा.आयुक्तांचे म्हणणे होते की, सर्वसाधारण सभेकडुन मंजुरी घ्यावी.

मा.सभापती :सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव ठेवायचा आहे. आजच्या आज ती संचिका पुर्ण करावी.

श्री.गजानन बारवाल :शहरामध्ये पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. पुर्ण शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत आहे.

उपअभियंता(श्री.काझी): एमईसीबी चा जुना पोल पडल्यामुळे विद्युत पुरवठा बंद होता त्यामुळे काही वेळ पाणी पुरवठा बंद आहे. दुरुस्तीचे सकाळ पासुन काम चालु आहे. दिड ते दोन तासामध्ये पाणी पुरवठा सुरळित करण्यात येईल. आणि जायकवाडीचे थकीत देयक बाकी असल्यामुळे आज सकाळी आकरा वाजता आपली दोन्ही पंप दोन तासाकरिता सिल केलेले आहे.

मा.सभापती :लवकरात लवकर प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करा आणि आजच्या आज पाणी पुरवठा सुरळित करण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल : महानगरपालिकेमध्ये जी भरती करणार आहोत त्याची माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त (महसुल) :भरती संदर्भात टेंडर झालेले आहे. परीक्षा पुर्वीची जाहिरात काढायची आहे ती संचिका मा.आयुक्तांकडे ॲप्रोलसाठी दिलेली आहे. ॲप्रोव्हल आल्यानंतर लगेचच जाहिरात देण्यात येईल.

मा.सभापती :ही प्रक्रिया पुर्ण व्हायला दोन महिने तरी लागणार आहे. तुमच्या अधिकारामध्ये मा.आयुक्तांकडुन तात्काळ ते करुन जाहिरात काढावी आणि नोकर भरती करावी.

श्री.गजानन बारवाल :महाराणा एजन्सीचे काही कर्मचारी कमी करण्यात आले. त्यांच्या जागेवर काही माजी सैनिक घेण्यात आले.त्यांना योग्यप्रकारचे काम देण्यात आले नाही म्हणुन ते कर्मचारी नाराज आहे.

अति.आयुक्त : खर्च कमी करण्यासाठी महाराणा एजन्सीचे काही कर्मचारी कमी केले आहे. घनकचरासाठी आणि इतर कामासाठी यातील काही कर्मचारी घनकचराकडे आणि काही झोन मध्ये देण्यात आले आहे.

श्री.गजानन बारवाल : मागच्या महिन्यामध्ये टॅक्स, पाण्याची वसुली मोहीम राबवली. आता पर्यंत किती टक्के वसुली झाली आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : आजच्या तारखे पर्यंत वसुलीची काय परिस्थिती आहे याचा खुलासा करावा.

लेखाधिकारी(श्री.पाटणी): आजच्या स्थितीला ७२ कोटी ५३ लाख रुपये वसुली आहे.

मा.सभापती : वसुली वाढवण्यासाठी काय प्रयत्न चालु आहे.

लेखाधिकारी(श्री.पाटणी): मागच्या वर्षाच्या तुलनेत २२ कोटी ३५ लाख रु. पुढे आहोत. सुचने नुसार प्रत्येक दिवसाचा टारगेट ठरवुन दिलेला आहे. सर्व्हेक्शनाचे काम सुध्दा त्यांच्या मार्फत चालु आहे.

श्री.गजानन बारवाल : कृषी उत्पन्न बाजारसमितीच्या नोटीस मध्ये नेमके काय झाले होते? खुलासा करावा.

लेखाधिकारी(श्री.पाटणी): ११ कोटी ३३ लाख रुपयाचे त्यांना एप्रिलमध्ये बिल दिले होते. त्यामध्ये मागच्या काही वर्षापासुन त्यांचा कर दिलेल्या रक्कमेला अक्षेप होता.

मा.सभापती : ११ कोटी रुपयाची त्यांना नोटीस दिली होती ती महापालिकेच्या अधिकारामध्ये नियमानुसार दिली होती का?

लेखाधिकारी(श्री.पाटणी): नोटीस महापालिकेच्या अधिनियमामध्ये राहुन दिली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीला ४ कोटी ५७ लाख रुपये कर दिलेला आहे. एमईसीबी ला त्यांचा कर वेगळा करुन दिला. नंतर पोल स्टोरेजला त्याचा कर वेगळा करुन दिला आणि कृषीपनण महासंघाला त्यांचा कर वेगळा करुन दिला.

मा.सभापती : या प्रकरणाची पुर्ण तपासणी करावी. पुर्ण संचिका, त्याची छायांकित प्रत आणि तुमचा अहवाल पुढच्या बैठकीच्या आधी माझ्याकडे द्यावा. श्री.पाटणी यांच्याकडे सहा चार्ज आहेत. कुठलातरी एक चार्ज त्यांच्याकडे देण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल : शहरामधील सर्व नळ कनेक्शन रेग्युलाईज करणार आहोत. त्यामध्ये खुप मोठी गफलत आहे. नळ कनेक्शन रेग्युलाईज करायला कोणी गेले तर त्यांना ३-४ हजार रुपये मागतात. श्री.खाजा यांचे म्हणणे आहे की, एखाद्या घराला जर टॅक्स लागलेला असेल आणि ते घर वडीलांच्या किंवा आजोबांच्या नावाने असेल आणि ते मयत झालेले असेल तर त्यांना वडीलांच्या किंवा आजोबांच्याच नावाने नळ कनेक्शन घेता येईल असे सांगितले जाते. याचा खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता (श्री.काझी) : प्रकरण काय आहे ते तपासुन घेतो.

मा.सभापती : शहरामध्ये जे नळ कनेक्शन रेग्युलाईज करण्यासाठी जी टीम काम करत आहेत त्यांच्या बरोबर मिटींग करुन स्पष्ट सुचना दिल्या पाहिजे. आजोबांच्याच नावाने नळ कनेक्शन घ्या असा आग्रह करण्यात येऊ नये. त्यांच्या वारसा हक्काचे प्रमाणपत्र घेऊन ते केले पाहिजे. आधी रेग्युलाईज करा, तुमच्या रेकॉर्डवर आणा नंतर तपासणी करण्यात यावी.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : शहरामधील भटक्या मोकाट कुत्र्यांचे काहीच नियोजन झालेले नाही. वार्डामध्ये काल एका व्यक्तीला कुत्रा चावला आहे.

मा.सभापती : मागच्या वेळेस सांगितले होते की, डॉग व्हॅन वार्डामध्ये गेल्यावर नगरसेवकांची भेट घ्यावी, त्यांची सही घ्यावी. ते काम चालु आहे का?

पशुसंवर्धन अधिकारी : सकाळी पाच वाचेपासुन डॉग व्हॅन फिरत असते. आणि ज्या वार्डामध्ये गाडी गेली तेथील नगरसेवकांची सही सुध्दा घेत आहोत.

श्रीमती.स्वाती नागरे : किती कुत्रे पकडले, काय काम केले ते दाखवावे मगच सही देण्यात येईल.

मा.सभापती : नगरसेवकांना विचारुनच वार्डामध्ये गाडी गेली पाहिजे. आणि रात्रीच्या वेळी गाडी फिरायला पाहिजे ते काम चालु करावे.

श्रीमती.नसरीन खान : गरम पाणी येथील दवाखाना तिथे चागले काम करणाऱ्या व्यक्तीला काढुन टाकले आहे. दुसरा व्यक्ती बरोबर काम करत नाही. पूर्वी जे कर्मचारी होते त्यांना देण्यात यावे.

मा.सभापती : गरम पाणी येथील हॉस्पिटलमध्ये जो कर्मचारी चांगला काम करत होता त्याची बदली करण्यात आली आहे. ते व्यक्ती आधी जिथे होते तिथे पाठवावे.

श्री.अब्दुल मं.नविद : शहरामधील स्मशान भुमि आणि कब्रस्तानमध्ये जे कर्मचारी काम करतात त्यांच्या मानधना बाबत अति.आयुक्तांनी काय कार्यवाही केली त्याचा खुलासा करण्यात यावा.

अति.आयुक्त : त्या कर्मचाऱ्यांना मानधन देण्यासाठी एक समिती तयार केली होती. मालमत्ता अधिकारी, कामगार अधिकारी आणि आरोग्य अधिकारी यांना घेऊन दोन वेळेस मिटींग घेतली. त्यांना मानधन देता येणार नाही, पण प्रत्येक मृत्यु मागे जो मोबदला द्यायचा आहे त्यासाठी धोरण निश्चित केले आहे. कोणते स्मशानभुमि आणि कब्रस्तान कोणाच्या मालकीची आहे याची माहिती वार्डकडुन मागितली आहे. पुन्हा मिटींग घेऊन निर्णय घेणार आहोत.

मा.सभापती : महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंत्यविधी करण्यासाठी जे लोक मेहनत करतात त्यांना काही तरी मानधन दिले पाहिजे.

श्री.अब्दुल मं.नविद : शहरामधील ५७ स्मशान भुमि आणि कब्रस्तान महानगरपालिकेच्या जागेवर आहेत. जे महानगरपालिकेच्या जागेवर आहेत तेथील लोकांना तरी मानधन दिले पाहिजे.

मा.सभापती :ते महानगरपालिकेचे कर्मचारी नाही तरी त्यांना प्रत्येक अंत्यविधी मागे काही तरी देण्यात यावे.

श्रीमती.सायरा बानो : मायोवेसल्स कंपनीला कचऱ्याचे टेंडर दिले गेले आहे. त्यांना प्रत्येकाच्या घरी जाऊन कचरा उचलण्याचे काम दिले होते परंतु त्यांच्याकडुन ते काम सुरु झालेले नाही. आणि जे नऊ जागेवर मशिनरी बसवणार होतो ते सुध्दा काम झाले नाहीत.

मा.सभापती : स्थायी समितीने नऊ मशिन बसवण्यासाठी मंजुरी दिलेली आहे आता पर्यंत नऊ मशिन बसवण्यात का आले नाही?

कक्ष प्रमुख(घनकचरा) : तीन मशिनची वर्कऑर्डर दिलेली आहे. चार मशिनचे शेड उपलब्ध होते त्या पैकी दोन ठिकाणी बसवण्यात आलेली आहेत.

मा.सभापती : रमानगरमध्ये का बसवण्यात आले नाही.

कक्ष प्रमुख(घनकचरा) : रमानगरमध्ये शेड नाही. ते श्री.काझी यांच्याकडे आहे.

उपअभियंता(श्री.काझी) : २६ लाखाचे ईस्टीमेंट ट्रान्स्फर करुन रमानगरमध्ये घेतले आहे परंतु एकही ठेकेदार काम करण्यास तयार नाही.वारंवार विनंती केलेली आहे. नऊ मशिन पैकी चिकलठाणा येथे दोन मशीन बसवुन कार्यरत केलेल्या आहेत. एक मशिन हर्सुल या ठिकाणी बसवणार आहोत.

मा.सभापती : डी-सेंट्रलाईजसाठी १२ जागा मंजुर केल्या होत्या त्या पैकी जिथे काहीच अडचण नाही अशा नऊ जागेवर मशिन बसवणार होतो. इतर जागेवर उर्वरित मशिन का बसवत नाही?

उपअभियंता (श्री.काझी) :रमानगर येथे बसवु शकतो,पण शेडसाठी कोणताही ठेकेदार काम घेण्यासाठी पुढे येत नाही.

मा.सभापती :नऊ मशिनची मंजुरी घेतली आहे,त्या मशिन लवकरच शेड करुन बसवण्यात यावे.

श्री.सिध्दांत शिरसाट : सातारा देवळाईमध्ये जे टँकरद्वारे पाणी पुरवठा चालु आहे त्यामध्ये नागरीकांकडुन महिन्याला ३५० रु. वसुली केले जाते. नागरीकांना पैसे भरण्यासाठी मेन ऑफिसला जावे लागते. त्यांना वार्डामध्येच पैसे भरण्याची व्यवस्था करुन देण्यात यावी.

मा.सभापती : १५ दिवसाच्या आत झोन ऑफिसला पैसे घेण्याची व्यवस्था करण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल : व्हाईट टॉपिंगचे रस्ते शहरामध्ये लवकरात लवकर व्हावे यासाठी टेंडर मंजुर केले आहे. परंतु ते काम थांबले आहे.

मा.सभापती : त्याचे अॅग्रीमेंन्ट का झाले नाही. कामे सुरु का झाले नाहीत. खुलासा करावा.

कार्य.अभियंता(रस्ते) : शासकीय अनुदानाच्या पॅकेज पी१ ते पी४ निविदा अंतिम झाल्या आहेत. आणि त्यांना कार्यादेश सुध्दा दिले आहे. वाटाघाटी करतांना त्यांनी १२ टक्के जी.एस.टी स्वतंत्र मांगितली आहे त्या शिवाय कॉन्ट्रॅक्टर करारनामा करण्यास तयार नाही.

मा.सभापती : जो प्रस्ताव, स्थायी समितीने मंजुरी दिली त्या पध्दतीने दोन दिवसाच्या आत अॅग्रीमेंन्टसाठी लागणारे कागदपत्रांची पुर्तता करावी, अन्यता निविदा प्रक्रिया नव्याने करण्यात येईल अशी आजच्या आज नोटीस करावी.

**विषय क्र. १५८ :**

दि.२९/०८/२०१८ (का.प.क्र.०८), दि.०३/०९/२०१८ (का.प.क्र.०९) तहकूब सभा, दि.०१/१०/२०१८ (का.प.क्र.०९ दि.०३/०९/२०१८ ची तहकूब सभा), दि.०१/१०/२०१८ (का.प.क्र.१०) व दि.०९/१०/२०१८ (का.प.क्र.११) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.सभापती : विषय क्र.१५८ ते १६७ पर्यंत मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

दि.२९/०८/२०१८ (का.प.क्र.०८),दि.०३/०९/२०१८ (का.प.क्र.०९) तहकूब सभा, दि.०१/१०/२०१८ (का.प.क्र.०९ दि.०३/०९/२०१८ ची तहकूब सभा),दि.०१/१०/२०१८(का.प.क्र.१०) व दि.०९/१०/२०१८ (का.प.क्र.११)रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली

**विषय क्र. १५९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८२ अंबिकानगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे सुशोभिकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक एसएसआर-२०१८-१९ नुसार र.रू.२९,१६,०१८/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील शहर सौंदर्यीकरण करणे या लेखाशिर्षक मधुन प्रस्तावित करण्यात आला आहे.

करीता अंदाजपत्रक र.रू.२९,१६,०१८/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८२ अंबिकानगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे सुशोभिकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.२९,१६,०१८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६०  :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०२ अंतर्गत मिलींदनगर येथील महानगरपालिकेची जुनी समाजमंदिराची अस्तित्वात असलेली इमारत ही ३० ते ३५ वर्षापूर्वी बांधण्यात आलेली आहे. सदर इमारत ही अतिशय जूनी व जीर्ण तसेच धोकादायक झालेली असल्याने, नमुद इमारत निष्काशीत करणेपूर्वी इमारतीची वास्तुतज्ञा मार्फत पाहणी केली असता, संबंधीत वास्तुतज्ञांनी इमारत निष्काशीत करणे आवश्यक असल्याचा अहवाल दिला आहे. त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करून प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर करणेची शिफारस करण्यात येत आहे.

करीता वॉर्ड क्र.१०२ अंतर्गत मिलींदनगर येथील महानगरपालिकेची जुनी, जीर्ण व धोकादायक झालेली समाजमंदिराची इमारत निष्काशीत करणेच्या मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव  :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०२ अंतर्गत मिलींदनगर येथील महानगरपालिकेची जुनी, जीर्ण व धोकादायक झालेली समाजमंदिराची इमारत निष्काशीत करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६१  :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१८ बेगमपुरा येथील बिबीका मकबराजवळील मिस्त्री कब्रस्तानचा विकास करणे या कामाचे सन २०१७-१८ च्या एसएसआर दरसुचीनुसार र.रू.२९,८६,५४४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च स्मशानभुमी विकास अंतर्गत सन २०१८-१९ या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले र.रू.२९,८६,५४४/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव  :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१८ बेगमपुरा येथील बिबीका मकबराजवळील मिस्त्री कब्रस्तानचा विकास करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.२९,८६,५४४/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६२  :**

मा.अतिरिक्त आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती सय्यदा मसिहा बेगम अमानुल्ला, सहशिक्षिका, यशोधरा कॉलनी, के.प्रा.शा.किराडपुरा (उर्दु) महानगरपालिका यांनी त्यांच्या पतीच्या आजाराचे उपचारापोटी (Actual Interior Wall Infraction with HT- ह्दयाचे आजार) र.रू.३,३२,८७२/- (अक्षरी रूपये तीन लक्ष बत्तीस हजार आठशे बहात्तर फक्त) इतका खर्च केला आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमामध्ये या आजाराचा आकस्मिक आजार म्हणुन समावेश करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने सदर आजारपणावर केलेल्या वैद्यकीय खर्च रक्कम रू.३,३२,८७२/- (अक्षरी रूपये तीन लक्ष बत्तीस हजार आठशे बहात्तर फक्त) एवढा झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रूपये २,६१,६४५/- (अक्षरी रू.दोन लक्ष एकसष्ट हजार सहाशे पंचेचाळीस फक्त) एवढी आहे. अनुज्ञेय रक्कमेच्या ९० टक्के र.रू.२,३५,४८०/-(अक्षरी रू.दोन लक्ष पस्तीस हजार चारशे ऐंशी फक्त) इतकी होते. एकूण खर्चाच्या ५ टक्के रक्कम रू.१६,६४३/- (रू.सोळा हजार सहाशे त्रेचाळीस फक्त) (एकूण खर्च रू.३,३२,८७२/- च्या ५ टक्के प्रमाणे रू.१६,६४३/-) मनपा फंडात जमा करून निव्वळ देय रक्कम रू.२,१८,८३७/- (अक्षरी दोन लक्ष अठरा हजार आठशे सदोतीस फक्त) देय आहे.

करीता श्रीमती सय्यदा मसिहा बेगम अमानुल्ला, सहशिक्षिका,यशोधरा कॉलनी, कें.प्रा.शा. किराडपुरा (उर्दु) महानगरपालिका यांनी रूपये १,५०,०००/- (रू.एक लक्ष पन्नास हजार फक्त) अग्रीम घेतलेला होता. निव्वळ देय रक्कम रू.२,१८,८३७/- (अक्षरी दोन लक्ष अठरा हजार आठशे सदोतीस फक्त) मधुन अग्रीमाची

रक्कम रू.१,५०,०००/- (रू.एक लक्ष पन्नास हजार फक्त) वजा जाता शिल्लक रक्कम रू.६८,८३७/- च्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती सय्यदा मसिहा बेगम अमानुल्ला, सहशिक्षिका, यशोधरा कॉलनी, के.प्रा.शा.किराडपुरा (उर्दु) महानगरपालिका यांनी त्यांच्या पतीच्या आजाराचे उपचारापोटी (Actual Interior Wall Infraction with HT- हृदयाचे आजार) र.रू.३,३२,८७२/- (अक्षरी रूपये तीन लक्ष बत्तीस हजार आठशे बहात्तर फक्त) इतका खर्च केलेला असल्यामुळे व त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रू.२,६१,६४५/- (अक्षरी रू.दोन लक्ष एकसष्ट हजार सहाशे पंचेचाळीस फक्त) एवढी आहे. अनुज्ञेय रक्कमेच्या ९० टक्के रक्कम रू.२,३५,४८०/- (अक्षरी रू.दोन लक्ष पस्तीस हजार चारशे ऐंशी फक्त) इतकी होते. एकूण खर्चाच्या ५ टक्के रक्कम रू.१६,६४३/- (रू.सोळा हजार सहाशे त्रेचाळीस फक्त) (एकूण खर्च रू.३,३२,८७२/- च्या ५ टक्के प्रमाणे रू.१६,६४३/-) मनपा फंडात जमा करून निव्वळ देय र.रू.२,१८,८३७/- (अक्षरी दोन लक्ष अठरा हजार आठशे सदोतीस फक्त) देय असल्याने,श्रीमती सय्यदा मसिहा बेगम अमानुल्ला, सहशिक्षिका,यशोधरा कॉलनी, कें.प्रा.शा. किराडपुरा (उर्दु) महानगरपालिका यांनी घेतलेले अग्रीम रू.१,५०,०००/- (रू.एक लक्ष पन्नास हजार फक्त) वजा जाता शिल्लक रक्कम रू.६८,८३७/- च्या वैद्यकीय खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग कार्यालय प्रभाग-ई/६ येथे कार्यरत सफाई मजूर श्री.विजु राणुबा नरवडे, यांना दिनांक २७/०६/२०१८ रोजी अस्वस्त वाटत असल्याने त्यांना सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. तेथील डॉक्टरांनी त्यांना हृदय विकाराचे धक्का असल्याचे व इजोप्लास्टी करण्याचे सल्ला देवून अंदाजे खर्चाचे प्रमाणपत्र दिले. संबंधीताने कार्यालयात दि.०२/०७/२०१८ रोजी अर्ज देवून त्यांना उपचारासाठी आवश्यक असलेली र.रू.२,००,०००/- (दोन लक्ष) रक्कमेचे अग्रीम मिळण्यासाठी विनंती केलेली आहे. त्यानुसार प्रकरण मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देयक) नियम १९६१ व वेळोवेळी जारी केलेल्या जी.आर. नुसार संबंधीतास उपरोक्त रूग्णालयाच्या नावे र.रू.१,५०,०००/- (दिड लक्ष) एवढा अग्रीम देणे योग्य असल्याचे मा.मुख्य लेखाधिकारी यांच्या मार्फत मंजुर होऊन मा.अतिरिक्त आयुक्त महोदय यांनी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार श्री.विजु राणुबा नरवडे, सफाई मजूर, प्रभाग-ई-६ यांना त्यांच्या आजारासाठी अग्रिम रक्कम देण्याचे प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग कार्यालय प्रभाग-ई/६ येथे कार्यरत सफाई मजूर श्री.विजु राणुबा नरवडे, यांना हृदय विकाराचे आजार व इजोप्लास्टी करण्यासाठी सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल या रूग्णालयाच्या नावे र.रू.१,५०,०००/- (दिड लक्ष) एवढा अग्रीम देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या एकूण १३२ बालवाडी शिक्षिका व १३ बालवाडी सेविका यांना मा.स्थायी समिती मंजूर ठराव क्रमांक ७९, दिनांक २३/०८/२०१८ नुसार जा.क्र.मनपा/शिक्षण/२०१८/५०९, दि.१८/०९/२०१८ रोजीच्या आदेशान्वये दिनांक १५/०६/२०१८ ते दिनांक ०३/११/२०१८ (दिवाळीच्या सुट्या लागेपर्यंत) पर्यंत तात्पुरती नियुक्ती/मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत खालील एकूण १२९ बालवाडी शिक्षिका व १३ सेविका या दिनांक २६/११/२०१८ पासून कार्यरत आहे.

| अ.क्र. | बालवाडीचे नाव | बालवाडी शिक्षिकेचे नाव |
|---|---|---|
| ०१. | कें.प्रा.शा. बेगमपुरा | श्रीमती वाघ प्रभा वामनराव |

| | | |
|---|---|---|
| ०२. | प्रा.शा.भावसिंगपुरा | श्रीमती मंगला फलके |
| ०३. | प्रा.शा.भावसिंगपुरा | श्रीमती कल्पना धनबीज |
| ०४. | प्रा.शा.भावसिंगपुरा | श्रीमती नंदा नलावडे |
| ०५. | प्रा.शा. पडेगाव | श्रीमती जावळे निता डी. |
| ०६. | प्रा.शा. पडेगाव | श्रीमती जगताप छाया यु. |
| ०७. | पडेगाव कॉलनी | श्रीमती वाणी एस.डी. |
| ०८. | पडेगाव कॉलनी | श्रीमती सिमा एकलेरे/बाराबोटे |
| ०९. | प्रा.शा. मिटमिटा | श्रीमती ब्राम्हणकर गिता हिरालाल |
| १०. | प्रा.शा. मिटमिटा | श्रीमती भगत एस.डी. |
| ११. | प्रा.शा. आरेफ कॉलनी | श्रीमती शाहीन बेगम (उर्दु) |
| १२. | आप्पावाडी | श्रीमती वंदना गायकवाड |
| १३. | अप्पावाडी बालवाडी | श्रीमती जाधव पी. एस. |
| १४. | के.प्रा.शा.बेगमपुरा | श्रीमती आम्रपाली इंगळे |
| १५. | प्रा.शा. ज्युब्लीपार्क | श्रीमती उर्मीला भातावाले |
| १६. | प्रा.शा. ज्युब्लीपार्क | श्रीमती आसिया बेगम |
| १७. | प्रा.शा. बडीगिरणी | श्रीमती मथुरा जैस्वाल |
| १८. | प्रा.शा. बडीगिरणी | श्रीमती शेख तरन्नुम |
| १९. | प्रा.शा. पोलिस हेड क्वॉर्टर | श्रीमती संगीता देवरे/जगताप |
| २०. | मंजूरपुरा | श्रीमती नुरजहाँ बेगम |
| २१. | प्रा.शा. जुनाबाजार | श्रीमती दया पांगारकर |
| २२. | प्रा.शा. जुनाबाजार | श्रीमती संध्या मैंद |
| २३. | प्रा.शा. नागेश्वरवाडी | श्रीमती शोभा घंटे |
| २४. | प्रा.शा. गरमपाणी | श्रीमती शिला काळे |
| २५. | प्रा.शा. वसंतभुवन | श्रीमती माधुरी बिडवई |
| २६. | प्रा.शा. किराडपुरा नं.१ | श्रीमती सोफिया बानो सै.अब्बास |
| २७. | प्रा.शा. किराडपुरा नं.१ | श्रीमती महेरून्नीसा बेगम |
| २८. | प्रा.शा. किराडपुरा नं.१ | श्रीमती नुसरत बेगम मनसुर खान |
| २९. | प्रा.शा. किराडपुरा नं.२ | श्रीमती एकबाल सीमी |
| ३०. | प्रा.शा. किराडपुरा नं.२ | श्रीमती रूबीना बेगम |
| ३१. | प्रा.शा. किराडपुरा नं.३ | श्रीमती अफरोज जहाँ |
| ३२. | प्रा.शा. किराडपुरा नं.३ | श्रीमती सुनीता शेजवळ |
| ३३. | प्रा.शा. शाहबाजार | श्रीमती नाजेमा बेगम |
| ३४. | प्रा.शा. शाहबाजार | श्रीमती मुबीना आफरीन |
| ३५. | प्रा.शा. चेलीपुरा | श्रीमती कौसर बेगम |
| ३६. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी मराठी | श्रीमती छाया राऊत |
| ३७. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी मराठी | श्रीमती संगीता बोर्से |
| ३८. | प्रा.शा. मिसारवाडी | श्रीमती पुष्पा गायकवाड |
| ३९. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी उर्दु | श्रीमती सीमा जबीन |
| ४०. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी उर्दु | श्रीमती समीना परवीन |
| ४१. | प्रा.शा. समतानगर | श्रीमती सुरैय्या बानो |
| ४२. | कें.प्रा.शा. सिडको एन-१२ | श्रीमती विघोतेकर सुवर्णा |
| ४३. | प्रा.शा. सिडको एन-११ | श्रीमती कुलकर्णी अंजली नंदकिशोर |
| ४४. | प्रा.शा. सिडको एन-९ | श्रीमती पोतदार मंजुषा |
| ४५. | प्रा.शा. मिसारवाडी | श्रीमती एस.सी. बिडवई |
| ४६. | प्रा.शा. शताब्दीनगर | श्रीमती दुसाने अनिता सुधाकर |

| | | |
|---|---|---|
| ४७. | प्रा.शा. शताब्दीनगर | श्रीमती शेळके सुशिला |
| ४८. | प्रा.शा. शताब्दीनगर | श्रीमती शेख हाजरा फातेमा |
| ४९. | प्रा.शा. गणेश कॉलनी | श्रीमती खान शहाना बेगम रहेमान अ. |
| ५०. | आंबेडकरनगर बालवाडी | श्रीमती कुलकर्णी एस.के. |
| ५१. | आंबेडकरनगर बालवाडी | श्रीमती पंडीत पी.के. |
| ५२. | फुलेनगर बालवाडी | श्रीमती सदावर्ते एस.एन. |
| ५३. | फुलेनगर बालवाडी | श्रीमती ठोंबरे ए. व्ही. |
| ५४. | गौतमनगर बालवाडी | श्रीमती बिऱ्हाडे एस.पी. (पंडित) |
| ५५. | गौतमनगर बालवाडी | श्रीमती महाजन व्ही.बी. |
| ५६. | सिध्दार्थनगर बालवाडी | श्रीमती पवार डी.एस. |
| ५७. | प्रा.शा. रोजेबाग (मराठी) | श्रीमती चुंचेकर अनिता जनार्दन |
| ५८. | प्रा.शा. रोजेबाग (उर्दु) | श्रीमती हाश्मी तहुरा सय्यद मसुद |
| ५९. | के.प्रा.शा. सिडको एन-७ | श्रीमती वंदना साळुबा सुरडकर |
| ६०. | प्रा.शा. सिडको एन-७ | श्रीमती पुष्पा आसाराम दाभाडे |
| ६१. | प्रा. व माध्यमिक नारेगाव (मराठी) | श्रीमती स्वाती भास्कर गौड |
| ६२. | प्रा. व माध्यमिक नारेगाव (मराठी) | श्रीमती रत्नप्रभा पंडीतराव खैरनार |
| ६३. | प्रा. व माध्यमिक नारेगाव (मराठी) | श्रीमती सुरेखा भिमसेन दाभाडे |
| ६४. | प्रा.शा. नारेगाव (उर्दु) | श्रीमती परवीन कौसर शेख बशिरोद्दीन |
| ६५. | प्रा.शाळा नारेगाव प्रकल्प | श्रीमती सुरेखा मोतीलाल परभणकर |
| ६६. | प्रा.शा. अशोकनगर | श्रीमती ज्योती संपत जाधव |
| ६७. | प्रा.शा. अशोकनगर | श्रीमती माधुरी व्यकंट ताजने |
| ६८. | प्रा.शाळा ब्रिजवाडी | श्रीमती अनिता शिवाजी साळवे |
| ६९. | बालवाडी आरतीनगर | श्रीमती मंगला जगन्नाथ काळे |
| ७०. | के.प्रा.शा. मुकुंदवाडी | श्रीमती शेख रेहाना शेख शहानुर |
| ७१. | के.प्रा.शा. मुकुंदवाडी | श्रीमती मंदा विठ्ठलराव मिसाळ |
| ७२. | के.प्रा.शा. मुकुंदवाडी | श्रीमती संगीता केशवराव शीलवंत |
| ७३. | प्रा.शा. भारतनगर नं.१ | श्रीमती पिंगळे शंकुतला बाबुराव |
| ७४. | प्रा.शा. चिकलठाणा | श्रीमती सविता भि. वाणी |
| ७५. | प्रा.शा. चिकलठाणा | श्रीमती नलिनी मं. पाटील |
| ७६. | प्रा.शा. विश्रांतीनगर | श्रीमती प्रतिभा विठ्ठलराव मांटे |
| ७७. | प्रा.शा.विटखेडा | श्रीमती शिरसाळे सविता |
| ७८. | प्रा.शा. विश्रांतीनगर | श्रीमती मांटे सुजाता |
| ७९. | प्रा.शा. संजयनगर | श्रीमती विद्या नेमीनाथ कानडे |
| ८०. | प्रा.शा. भारतनगर नं.२ | श्रीमती देशमुख माधुरी विठ्ठलराव |
| ८१. | संजयनगर प्रकल्प | श्रीमती आशा शेगावकर |
| ८२. | संजयनगर प्रकल्प | श्रीमती मंगला नाडे |
| ८३. | के.प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती मीरा मोरे |
| ८४. | प्रा.शा. एकनाथनगर | श्रीमती संगीता सोनवणे |
| ८५. | प्रा.शा. गारखेडा (मराठी) | श्रीमती आशा घायतिलक |
| ८६. | प्रा.शा. विष्णुनगर | श्रीमती प्रमिला तायडे |
| ८७. | प्रा.शा. जवाहर कॉलनी | श्रीमती आशा केनेकर |
| ८८. | प्रा.शा. इंदिरानगर नं.२ | श्रीमती मंजुषा अमेशचंद चांदेकर |
| ८९. | प्रा.शा. हनुमाननगर | श्रीमती निलीमा राजेश्वर कवठेकर |
| ९०. | प्रा.शा. भारतनगर नं.१ | श्रीमती दुर्गा खराटे |
| ९१. | प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर नं.१ | श्रीमती रेखा धोटे |

| | | |
|---|---|---|
| ९२. | प्रा.शा.मिसारवाडी | श्रीमती शिला मनगटे |
| ९३. | बालवाडी देवळाई म्हाडा | श्रीमती कामिनी घोरपडे |
| ९४. | प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर (उर्दु) | श्रीमती समीना तडवी |
| ९५. | केंद्र प्रा.शा.बन्सीलालनगर | श्रीमती शालुबाई कांबळे |
| ९६. | प्रा.शा. पदमपुरा | श्रीमती बंसीले |
| ९७. | रमानगर बालवाडी | श्रीमती वानखेडे छाया |
| ९८. | प्रा.शा. शहानुरवाडी | श्रीमती अरूणा नाईक |
| ९९. | प्रा.शा. नुतन कॉलनी | श्रीमती दिक्षित संध्या |
| १००. | के.प्रा.शा. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती कमल सांडु सोनवणे |
| १०१. | के.प्रा.शा. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती छाया व्यकटराव चापोलिकर |
| १०२. | प्रा.शा.जिन्सी (मराठी) | श्रीमती विमल बाबुराव काथार |
| १०३. | प्रा.शा. रेंगटीपुरा (उर्दु) | श्रीमती नाजिया नसरीन जहिरूद्दीन |
| १०४. | प्रा.शा. जिन्सी / रेंगटीपुरा | श्रीमती बशीर फातेमा |
| १०५. | प्रा.शा. कैलासनगर | श्रीमती स्मिता सुरेश पुरी |
| १०६. | प्रा.शा. कैलासनगर | श्रीमती संगीता माणीकलाल शुक्ला |
| १०७. | प्रा.शा. कैलासनगर | श्रीमती सुनीता लिंबाजीराव कोल्हे |
| १०८. | प्रा.शा. रोहिदासपुरा | श्रीमती लक्ष्मी छगनराव बुरकुले |
| १०९. | प्रा.शा. खोकडपुरा | श्रीमती मंगला नारायण वाहुळे |
| ११०. | प्रा.शा. खोकडपुरा | श्रीमती कुसुम रमेश जाधव |
| १११. | प्रा.शा. पैठणगेट (उर्दु) | श्रीमती शबाना बेगम शेख बाबर |
| ११२. | के.प्रा.शा. हर्सुल गाव | श्रीमती चंद्रकला गणपत बकले |
| ११३. | के.प्रा.शा. हर्सुल गाव | श्रीमती रमा टेकचंद दुबे |
| ११४. | प्रा.शा. हर्सुल वसाहत | श्रीमती छाया छगन बकले |
| ११५. | प्रा.शा. हर्सुल वसाहत | श्रीमती सुर्यकला बालचंद पचलोरे |
| ११६. | प्रा.शा. सेंट्रल जेल | श्रीमती साधना नानाजी पवार |
| ११७. | प्रा.शा. सेंट्रल जेल | श्रीमती सुरेखा कैलास काळे |
| ११८. | प्रा.शा. हर्सुल उर्दु | श्रीमती जुफिशान जझा हकीम फैज करीम |
| ११९. | प्रकल्प फुलेनगर बालवाडी | श्रीमती महानंदा श्रीरंग काळे |
| १२०. | प्रकल्प फुलेनगर बालवाडी | श्रीमती पुनाबाई धासिंग हरणे |
| १२१. | के.प्रा.शा. बनेवाडी राहुलनगर प्रकल्प | श्रीमती गहिरे के.एम. |
| १२२. | के.प्रा.शा.बनेवाडी | श्रीमती पंडीत व्ही.जे. |
| १२३. | के.प्रा.शा.बनेवाडी | श्रीमती निकम इ.आर. |
| १२४. | प्रा.शा. कांचनवाडी | श्रीमती संगिता मैंद |
| १२५. | प्रा.शा. नक्षत्रवाडी | श्रीमती तामगाडगे निर्मला |
| १२६. | प्रा.शा. विटखेडा | श्रीमती गायकवाड कविता |
| १२७. | प्रा.शा. वाल्मी | श्रीमती जाधव लता कडुबा |
| १२८. | के.प्रा.शा. बेगमपुरा | श्रीमती मृनाल पंडीत |
| १२९. | प्रा.शा. जुनाबाजार | श्रीमती फरजाना बेगम |
| **बालवाडी सेविकाचे नाव** | | |
| ०१. | मनपा शाळा एकनाथनगर | श्रीमती बुगनाबी सय्यद युसूफ |
| ०२. | मनपा शाळा संजयनगर (म.) | श्रीमती शोभा तुळशीराम प्रधान |
| ०३. | मनपा शाळा संजयनगर (म.) | श्रीमती अंबिका तुकाराम गायकवाड |
| ०४. | मनपा शाळा सिल्लेखाना | श्रीमती जनाबाई भिवसन शेजुळ |
| ०५. | फंक्शन हॉल किराडपुरा | श्रीमती कुसूम अशोक अमृतफळे |
| ०६. | मनपा शाळा बडीगिरणी | श्रीमती परीगाबाई दाभाडे |

| | | |
|---|---|---|
| ०७. | मनपा शाळा रोजेबाग (प्रकल्प) | श्रीमती अनिसा बेगम अजगर खाँ |
| ०८. | मनपा शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर नं.२ | श्रीमती मिनाबाई बालकिशन पठाडियॉ |
| ०९. | मनपा शाळा संजयनगर (जिन्सी) | श्रीमती संगिता कर्नल |
| १०. | आंबेडकरनगर (फुलेनगर सिडको एन-७) | श्रीमती लक्ष्मी सत्यविजय काळे |
| ११. | मनपा शाळा नारेगांव | श्रीमती बेबी मदनलाल बांगरे |
| १२. | मनपा शाळा मुलींची उस्मानपुरा | श्रीमती बबीता इंगळे |
| १३. | मनपा शाळा शहानुरवाडी | श्रीमती कल्याणी सुनिल गायकवाड |

करीता सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील द्वितीय सत्रात उपरोक्त १२९ बालवाडी शिक्षिका व १३ बालवाडी सेविका यांना दिनांक २६/११/२०१८ ते उन्हाळ्याच्या सुट्या लागेपर्यंत दिनांक ३०/०४/२०१९ पर्यंतची मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या एकूण १२९ बालवाडी शिक्षिका व १३ सेविका (प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते १२९ बालवाडी शिक्षिका व अ.क्र.०१ ते १३ सेविका) यांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील द्वितीय सत्रात दिनांक २६/११/२०१८ ते उन्हाळ्याच्या सुट्या लागेपर्यंत दिनांक ३०/०४/२०१९ पर्यंतची मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६५ :**

विषय : वार्ड क्र.३५ नारेगाव येथील पटेलनगर,अजीजनगर, परिसरामध्ये नविन ड्रेनेज लाईन टाकणे, या कामाचे ठेकेदार मे.सिध्दी कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.४७,२८,२४२/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर Tender Id. 2018_AMCA_344060_2

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.०५,सिडको |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.३५ नारेगाव येथील पटेलनगर, अजीजनगर,परिसरामध्ये नविन ड्रेनेज लाईन टाकणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दि.०७/०८/२०१८ विषय क्र.७१ र.रू.४९,८९,६०२/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.४७,५२,००१/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०५/०९/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०७/०९/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन (०३) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.सिध्दी कन्स्ट्रक्शन | र.रू.४७,२८,२४२/- | अं.प.दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराने |
| ०२. | श्री.प्रशांत बांगड | र.रू.४८,२३,२८२/- | अं.प.दरापेक्षा १.५० टक्के जास्त दराने |
| ०३. | श्री.योगेश बोराडे | र.रू.४९,४२,०८२/- | अं.प.दरापेक्षा ४.०० टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |

| | | |
|---|---|---|
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | प्रो-पुअर बजेट |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | आहे. |
| तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.सिध्दी कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.४७,२८,२४२/-पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ नारेगाव येथील पटेलनगर,अजीजनगर, परिसरामध्ये नविन ड्रेनेज लाईन टाकणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.सिध्दी कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.४७,२८,२४२/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १६६ :</u>**

विषय : वार्ड क्र.८७ सदाशिवनगर येथील गणपती मंदिर व पी-३ मधील हनुमान मंदिर समोरील जागा विकसीत करणे या कामाचे ठेकेदार श्री.आकाश बरतुने यांचेकडून ०.२० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२९९२८७४.०९/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर Tender Id. 2017_AMCA_342017_1

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | अभियंता झोन क्र.०६ |
| २ | कामाचे स्वरुप | जागा विकसीत करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | २९९८८७१.८४ |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-महासेल निविदा सूचना दि.२७/०७/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | --- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १२/०९/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन (०३) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.आकाश बरतुने | २९९२८७४.०९ | ०.२० टक्के कमी दराने |
| ०२. | श्री.अशोक रमेश राऊत गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर, औरंगाबाद | २९९८८७१.८४ | अं.प. दराने |
| ०३. | श्री.कैलाश नामदेव वाढे | ३१४८८१५.४३ | ५ टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |

| | | |
|---|---|---|
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | विकास योजने अंतर्गत भुखंडाचे संरक्षण |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.१०/०७/२०१८ विषय क्र.२६ |
| तरी विषयांकित काम ठेकेदार श्री.आकाश बरतुने यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२९९२८७४.०९/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८७ सदाशिवनगर येथील गणपती मंदिर व पी-३ मधील हनुमान मंदिर समोरील जागा विकसीत करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार श्री.आकाश बरतुने यांचेकडून ०.२० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२९,९२,८७४.०९/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १६७ :</u>**

विषय : वार्ड क्र.१७ नंदनवन कॉलनी येथे स्वामी विवेकानंद हायस्कुल ते मनपा आरोग्य केंद्रापर्यंत व्हाईट टॉपींग रस्ता तयार करणे या कामाचे ठेकेदार मे.मिताली कन्स्ट्रक्शन, कंत्राटदार यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा टेंडर र.रू.३८,१२,४९३.४०/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-१ |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.१७ नंदनवन कॉलनी येथे स्वामी विवेकानंद हायस्कुल ते मनपा आरोग्य केंद्रापर्यंत व्हाईट टॉपींग रस्ता तयार करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय.<br>र.रू.३९,९९,६३०/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ३८,१२,४९३.४०/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेंडर विभाग प्रसिध्दीचा दि.२५/०१/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दिनांक ३०/०१/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दिनांक १७/०२/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन (०३) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | रूद्रा कन्स्ट्रक्शन | ३८,५०,६१८.३४ | अं.प.दरापेक्षा १.०० टक्के जास्त दराने |
| ०२. | अभय भोसले | ३८,८८,७४३.२७ | अं.प.दरापेक्षा २.०० टक्के जास्त दराने |
| ०३. | मे.मिताली कन्स्ट्रक्शन | ३८,१२,४९३.४० | अंदाजपत्रकीय दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | मंजुर रेखाकंनात विकास कामे नवीन कॉंक्रीट रस्ते |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | मंजुर रेखाकंनात विकास कामे नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे. |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लेखा विभाग, महानगरपालिका औरंगाबाद |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |
| विषयाकिंत कामासाठी ठेकेदार मे.मिताली कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांनी अंदाजपत्रकीय दराने निविदा दाखल केली आहे. त्यानुसार ठेकेदार मे.मिताली कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.३८,१२,४९३.४०/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१७ नंदनवन कॉलनी येथे स्वामी विवेकानंद हायस्कुल ते मनपा आरोग्य केंद्रापर्यंत व्हाईट टॉपींग रस्ता तयार करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.मिताली कन्स्ट्रक्शन, यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.३८,१२,४९३.४०/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६८ : (कर्मचाऱ्याचे अपील)**

श्री.भाऊसाहेब रूंजाजी कांबळे, पाणी पुरवठा मजुर (निलंबीत) यांना वॉर्ड-ई कार्यालय, महानगरपालिका औरंगाबाद येथे कार्यरत असतांना पाणीपट्‌टी/मालमत्ता कराची रक्कम मनपा फंडात जमा न करणे,सदर रकमेचा अपहार केल्यामुळे,प्रथमतः संबंधीतास निलंबीत करून खाते चौकशी करण्यात आलेली आहे.

खाते चौकशी अंती श्री.भाऊसाहेब रूंजाजी कांबळे, पाणी पुरवठा मजुर (निलंबीत) हे कर्मचारी दोषी आढळून आल्यामुळे व त्यांचे विरूध्दचे दोषारोप सिध्द झाल्यामुळे, श्री.भाऊसाहेब रूंजाजी कांबळे, पाणी पुरवठा मजुर (निलंबीत) यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे प्रकरण तीन मधील उपनियम (५) १ (सात) अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतून कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-२/८०३/२०१६, दिनांक ०७/०७/२०१६ अन्वये सक्तीने सेवानिवृत्त करण्यांत आलेले आहे. संबंधीताने या आदेशाविरूध्द स्थायी समितीकडे अपील सादर केलेले आहे. करीता संबधीताने स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचारविनिमय करून निर्णय घेणे.

मा.सभापती : विषय क्र.१६८ ला स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. १६९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२६ नेहरूनगर अंतर्गत गल्ली नं. १ ते ८ मध्ये विविध विकास कामे करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन २०१७-१८ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.३९,९९,९०६/- चे तयार करण्यात आले आहे.

प्रस्तावीत कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील वार्ड क्र.०३-एसीआर पान क्र.०९ अ.क्र.-०७ वर रक्कम रूपये ४०.०० लक्ष तरतुद मध्ये उपलब्ध नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षकात ठेवण्यात आलेल्या ४०.०० लक्ष तरतुद मधुन करण्यात येणार आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात विविध विकास कामे करणे इ. बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाचे रक्कम रू.३९,९९,९०६/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : ऐनवेळचे विषय क्र.१६९ ते १७३ पर्यंत मंजुर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२६ नेहरूनगर अंतर्गत गल्ली नं. १ ते ८ मध्ये विविध विकास कामे करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.३९,९९,९०६/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०८ हमालवाडा अंतर्गत विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रीटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन २०१७-२०१८ नुसार रक्कम रू.२९,९७,५२४/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.२२/१०/२०१८ अन्वये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प २०१८-२०१९ मधील लेखाशिर्ष नविन कॉंक्रीट रस्ते अंतर्गत पृष्ठ क्र.स्पील ओव्हर वर्क-झोन-८ पा.क्र.२०६ वर अ.क्र.१७ वर रूपये ३०.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२९,९७,५२४/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०८ हमालवाडा अंतर्गत विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रीटींग करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.२९,९७,५२४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३८ एमआयडीसी चिकलठाणा, सिडको एन-१ सेक्टर ई व एफ येथील श्री.काकडे यांच्या घरापासून ते एमआयडीसी पर्यंतच्या रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एसएसआर सन २०१७-१८ च्या दरसुची नुसार र.रू.४९,९०,६००/- चे तयार करण्यात आले असून सदरील काम मनपा अर्थसंकल्प सन २०१८-२०१९ मधील लेखाशिर्ष नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा मधून प्रस्तावीत आहे. सदरील सदर अंदाजपत्रकास दिनांक १९/१०/२०१८ रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी, वार्ड क्र.३८ एमआयडीसी चिकलठाणा, सिडको एन-१ सेक्टर ई व एफ येथील श्री.काकडे यांच्या घरापासून ते एमआयडीसी पर्यंतच्या रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे या कामाचे र.रू.४९,९०,६००/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३८ एमआयडीसी चिकलठाणा, सिडको एन-१ सेक्टर ई व एफ येथील श्री.काकडे यांच्या घरापासून ते एमआयडीसी पर्यंतच्या रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.४९,९०,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७२ :**

विषय : वार्ड क्र.१९ आरेफ कॉलनी येथील मुख्य व अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामाचे ठेकेदार मे.मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी, यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.१० टक्के कमी दराची निविदा टेंडर र.रू.७९,९९,४३०/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.२०१८-एएमसीए-३१३१०५-१, सन २०१७-२०१८

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-१ |
| २ | कामाचे स्वरुप | रस्त्याचे कॉंक्रीटीकरण. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. र.रू.७९,९९,४३०/- मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.६२८, दि.०६/०८/२०१८ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ७७,६६,५५४/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेंडर विभाग |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दिनांक २४/०४/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दिनांक १७/०५/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी | ७६,०३,४५६.८१/- | अं.प.दरापेक्षा ०२.१० टक्के कमी दराने |
| ०२. | रूद्र कन्स्ट्रक्शन औरंगाबाद | ८३,८७,८७८.८१/- | अं.प.दरापेक्षा ८.०० टक्के जास्त दराने |
| ०३. | आर.टी. कन्स्ट्रक्शन | ९०,०८,४२६.५१/- | अं.प.दरापेक्षा १५.९९ टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | निविदा समिती सभा दि. |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | मा.महापौर यांनी सुचविलेली कामे अंदाजपत्रक २०१७-१८ |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | मा.महापौर यांनी सुचविलेली कामे अंदाजपत्रक २०१७-१८ |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लेखा विभाग, महानगरपालिका औरंगाबाद |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |

विषयाकिंत कामासाठी ठेकेदार मे.मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी, औरंगाबाद यांनी २.१० टक्के कमी दराने निविदा दाखल केली आहे. त्यानुसार ठेकेदार मे.मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी, औरंगाबाद यांचेकडून २.१० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.७६,०३,४५६.८१/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१९ आरेफ कॉलनी येथील मुख्य व अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी,औरंगाबाद यांचेकडून २.१०%कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.७६,०३,४५६.८१/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.०२/०७/२०१८ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समितीने पारीत केलेला ठराव क्र.१३ अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१८/११२७. दि.०६/०८/२०१८ रोजीच्या आदेशान्वये दि.२३/०५/२०१८ ते दि.२२/११/२०१८ पर्यंत तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवरील वर्ग-३ संवर्गात खालील कर्मचारी कार्यरत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | कार्यरत विभाग | दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | गजानन आढाव | स्वच्छता निरीक्षक | घनकचरा व्यवस्थापन कक्ष | रु.५२५/- |
| २. | संजय महादू नंदन | पशुधन पर्यवेक्षक | प्राणि संग्रहालय विभाग | रु.५२५/- |
| ३. | राहूल नटवरलाल पटेल | मिश्रक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ४. | दत्ता सरोदे | कनिष्ठ लिपीक | इमारती व उद्यान बांधकाम विभाग | रु.५२५/- |
| ५. | राजू सुरडकर | कनिष्ठ लिपीक | इमारती व उद्यान बांधकाम विभाग | रु.५२५/- |
| ६. | शफीक शहाबाज रफीक खान | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.१ कार्यालय | रु.५२५/- |
| ७. | मो.मुसा मो.याकूब कुरेशी | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.२ कार्यालय | रु.५२५/- |
| ८. | प्रभु लक्ष्मण चव्हाण | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.५ कार्यालय | रु.५२५/- |
| ९. | विजय पाटील | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.७ कार्यालय | रु.५२५/- |
| १०. | कृष्णा ठोकळ | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.८ कार्यालय | रु.५२५/- |
| ११. | माधुरी शेंदूरकर | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.९ कार्यालय | रु.५२५/- |
| १२. | अखिल उर रहेमान | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड अभियंता क्र.१ कार्यालय | रु.५२५/- |
| १३. | राजेश पगारे | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड अभियंता क्र.४ कार्यालय | रु.५२५/- |
| १४. | राजेश पाटील | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड अभियंता क्र.९ कार्यालय | रु.५२५/- |
| १५. | विमल चोखाजी साठे | कनिष्ठ लिपीक | जनसंपर्क विभाग | रु.५२५/- |
| १६. | भारती जगताप | कनिष्ठ लिपीक | जनसंपर्क विभाग | रु.५२५/- |
| १७. | इकबाल जावेद रज्जाक | कनिष्ठ लिपीक | संगणक विभाग | रु.५२५/- |
| १८. | आनंद खरात | कनिष्ठ लिपीक | लेखा विभाग | रु.५२५/- |
| १९. | विजय हिवराळे | कनिष्ठ लिपीक | कार्यकारी अभियंता (वॉर्ड १,२,३,८) विभाग | रु.५२५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०. | मुक्तेश्वर लोखंडे | कनिष्ठ लिपीक | कार्यकारी अभियंता (वॉर्ड १,२,३,८) विभाग | रु.५२५/- |
| २१. | विनोद साळवे | कनिष्ठ लिपीक | सिध्दार्थ जलतरण विभाग | रु.५२५/- |
| २२. | मिलींद विठ्ठल गायकवाड | कनिष्ठ लिपीक | रस्ते,इमारती,उद्यान (वॉर्ड-अ) | रु.५२५/- |
| २३. | अफसर सिद्दीकी | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| २४. | संगिता थोरात | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| २५. | सुभाष धांडे | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| २६. | बी.के.गायकवाड | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| २७. | विनोद वासेकर | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| २८. | अलका नारायण बोरसे | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| २९. | अफजलुन्नीसा नहेरी बशीर शेख | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| ३०. | अशोक किसनराव जाधव | कनिष्ठ लिपीक | पाणी पुरवठा (वॉर्ड क्र.१,२,९) विभाग | रु.५२५/- |
| ३१. | रावसाहेब जावळे | कनिष्ठ लिपीक | प्राणि संग्रहालय विभाग | रु.५२५/- |
| ३२. | शेख महेबुब हुसेन | कनिष्ठ लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ३३. | अर्चना निकाळजे | संगणक ऑपरेटर | लेखा परीक्षण विभाग | रु.५२५/- |
| ३४. | जयश्री झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकुल कक्ष | रु.५२५/- |
| ३५. | पद्माकर जाधव | डार्करुम सहाय्यक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ३६. | आरेफ खान मसूद खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ३७. | भगीरथ जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ३८. | हरिश्चंद्र सोनवणे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ३९. | शेख फईमोद्दीन शेख बशीराद्दीन | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४०. | मिलींद घाटे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४१. | शेख रऊफ शेख माणिक | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४२. | महम्मद याहया खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४३. | नजीर खान पठाण | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४४. | जगदिश गायकवाड | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४५. | प्रभु पवार | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४६. | रमेश शिरसाठ | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४७. | महादेव मिसाळ | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४८. | शेख निजाम शेख दगडु | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४९. | रंगनाथ बकले | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५०. | गुलाम रसूल खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५१. | रविंद्र पाटील | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५२. | अरुण बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५३. | सय्यद फरिदोद्दीन | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५४. | सतिश जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५५. | शेख जावेद शेख अमजद | देखरेख करण्यासाठी | छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय | रु.५२५/- |
| ५६. | सर्वेश नांद्रेकर | देखरेख करण्यासाठी | छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय | रु.५२५/- |
| ५७. | मोहम्मद रफीयोद्दीन | चित्रपट चालक | पशुधन विकास विभाग | रु.५२५/- |
| ५८. | रमेश शिंदे | प्लॅन्ट ऑपरेटर | सिध्दार्थ जलतरण विभाग | रु.५२५/- |

करिता उक्त कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(३) च्या परंतुकान्वये ०२ दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.२८/११/२०१८ पासून पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-३ संवर्गातील प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते ५८ (एकूण-५८,वर्ग-३ संवर्गातील कर्मचारी) कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) च्या परंतुकान्वये ०२ दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.२८/११/२०१८ पासून पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरती नियुक्ती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद